तातडीचे
=======

जा.क्र.माध्य-३[१४]नमाशा/मान्यता/पुवि/९३
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,
पुणे-४११ ००१ यांचे कार्यालय
दिनांक:- ९ / ७ /१९९३

प्रति,

सचिव,
रयत शिक्षण संस्था,
सातारा

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ:- शासन पत्र क्र एसएसएन/१०९३/३४५०/माशि/१ दिनांक २ जुलै १९९३

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदिला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९३ पासून विना अनुदान तत्वावर /कायम विना अनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा,माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबीची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येतआहे.

१] या नविन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त]शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एसएसएन १०८८/१६६९-एन माशि-१ दिनांक १०/२/८[illegible] अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे[उदा: विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतइ.]काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.]फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही.अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमी पत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५] जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था[प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज]कायदा१९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

७] म.माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच २०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

....२/-

९] शिक्षक /कर्मचारी संघा शिक्षणाधिकारी[माध्यमिक] यांचेकडून मंजूर करून घेण्यात येईल..

१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यावयात व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११] शालेय वातावरण ,इमारत प्रयोगशाळा इ.बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा.शिक्षण संचालक,यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी
=======

[१] संबंधित संस्था,मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

[२] संस्थेविरूध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्या बाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

वरील बाबी पैकी,एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.न. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | रयत शिक्षण संस्था,सातारा | तांदळी,ता.शिरूर | आठवी<br>जून ९३ पासून | मराठी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहीत प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे.तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहीत केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

True Copy

Principal,
New Eng. School Jr.-College of Commerce
Shirur Dist. Pune

प्रतिलिपी

१] शिक्षणाधिकारी[माध्यमिक] जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराचि उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झालेली असल्यास त्या विषयी [illegible] सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेला प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेचे वर्ग -२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्याकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.